# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## **साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

सकाळ
मंगळवार,
४ फेब्रुवारी २०१४
५

# इतिहासात मराठ्यांचे योगदान मोठे

## डॉ. सदानंद मोरे यांचे मत, राजगुरुनगरला साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला

**राजगुरुनगर, ता. ३ :** हिंदुस्थानच्या इतिहासात मराठ्यांचे योगदान मोठे असून चुकीच्या पद्धतीने इतिहास लिहिल्याने याकडे दुर्लक्ष झाले आहे. नव्या पिढीसाठी हा इतिहास समग्रपणे व सम्यकपणे मांडण्याची गरज आहे, असे मत साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी राजगुरुनगर येथे व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित केलेल्या माजी आमदार कै. साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेमध्ये 'महाराष्ट्राचा इतिहास - एक वेगळा दृष्टिकोन' या विषयावर पुष्प गुंफताना मोरे बोलत होते. या वेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव ॲड. राम कांडगे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर व संचालक उपस्थित होते.



**राजगुरुनगर (ता. खेड) : कै. साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. सदानंद मोरे.**

मोरे म्हणाले, ''देशाची सत्ता ब्रिटिशांच्या हातात जाण्यापूर्वी दिल्लीचे तख्त हे मराठ्यांच्या ताब्यात होते. २/३ भागावर मराठ्यांचे वर्चस्व होते. ब्रिटिशांना फक्त मराठ्यांच्या विरोधातच लढावे लागले. इतिहासलेखन करताना ब्रिटिश इतिहासकारांनी स्वार्थीपणे मराठ्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास न मांडता त्यांना लुटारू संबोधले आणि इतिहासाच्या खुणा नष्ट केल्या. पुढील पिढीला मराठ्यांचा ज्वलंत इतिहास कळू नये हा त्यामागे उद्देश होता.''

'मुकी होत चाललेली घरे' या विषयावर बोलताना प्रकाश पाठक म्हणाले, ''ज्ञान व नीती यांचा परस्परसंबंध असून प्रत्येकाने ज्ञानवंत असतानाच नीतिवंतही असले पाहिजे. पूर्वीची माणसे सुशिक्षित नसली तरी सुसंस्कारित होती हे विसरता कामा नये.''

संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेले पसायदान हा जागतिक शांततेचा नकाशा असून त्याचा अर्थ सर्वांनीच समजावून घ्यायला हवा. संगीत हा जीवनातील अविभाज्य घटक असून सुखाने शरीर समृद्ध होते तर दुःखाने भावजीवन समृद्ध होते, असे मत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले. या वेळी त्यांनी मोगरा फुलला, येरे घना, माझ्या सारंगा या गीतांसह अनेक गीतांची निर्मितिप्रक्रिया कशी झाली ते उलगडून सांगितले.

पत्रकार राजीव खांडेकर यांनी 'राष्ट्रनिर्मितीत युवकांचे स्थान' या विषयावर बोलताना, आजच्या तरुणांनी दैववादावर विसंबून न राहता स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घ्यावी व समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. शरद उपाध्ये यांनी फलज्योतिषातील गमती-जमती सांगितल्या. रामदासमहाराज कैकाडी 'अध्यात्म आणि विज्ञान' या विषयावर बोलताना, युवकांनी प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करूनच ती स्वीकारण्याचे आवाहन केले. बाबासाहेब परीट यांचे कथाकथन झाले. व्याख्यानमालेचे संयोजन प्राचार्य एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल कुलकर्णी व सहकाऱ्यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख